Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

Vol.- 3 Issue - 4

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December
2016

Chief Editor
Prof. Dhanraj Dhangar
Asst. Prof. (Deptt. of Marathi)
M.G.V. S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

This Journal is indexed in :
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmoc Impact Factor (CIF)
Global Impact Factor (GIF)
Universal Impact Factor (UIF)
International Impact Factor Services (IIFS)
Indian Citation Index (ICI)
Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjournev.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER RÉFREED & INDEXED JOURNAL**

Octomber-November-December-2016
Vol.-3, Issue-4

Chief Editor
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] INDIA

RESEARCH JOURNEY

या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत. त्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ संहितेची सर्व जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.

- कार्यकारी संपादक

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 225/-

ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2016

## INDEX



| No. | Title of the Paper / Author's Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Ethanobotanical Studies on *Terminalia chebula* Retz. among the Indigenous people of Nizamabad and Kamareddy Districts, Telangana State. **Vijigiri Dinesh and Shivraj Kashinath Bembrekar** | 04 |
| 2 | Comparative Literature: Some Critical Observations **Dr. Leena Pandhare** | 08 |
| 3 | 'अंधेर नगरी' : प्रतीकात्मकता एवं युगबोध **डॉ. अमोल दंडवते** | 15 |
| 4 | रमणिका गुप्ता की पर्यावरण संविद्य कविता **सुश्री वंदना पाटील** | 19 |
| 5 | पर्यावरणीय समस्या आणि मनुष्य केंद्रवाद : ऐतिहासिक निरीक्षण **डॉ. संजय ह. पाटील** | 22 |
| 6 | मराठीचा उगमकाल, जनक भाषा आणि अभिजातता **डॉ. प्रमोद अंबेकर** | 37 |
| 7 | मराठी संत साहित्य **डॉ. रामदास रसाळ** | 43 |
| 8 | संत साहित्य आणि दलित साहित्य **डॉ. लक्ष्मिकांत येळवंडे** | 46 |
| 9 | बंजारा साहित्यातील स्त्री चित्रण **प्रा. व्ही. बी. राठोड** | 49 |
| 10 | भटक्या-विमुक्त जमातीच्या स्त्री-आत्मकथनांचा सामाजिक, भाषिक व सांस्कृतिक अभ्यास **डॉ. गोपाल ढोले** | 55 |
| 11 | मराठीतील पहिले प्रवासवर्णन : माझा प्रवास **डॉ. मीनाक्षी पाटील** | 58 |
| 12 | दलित पत्रकारितेचा प्रारंभ **डॉ. रामदास रसाळ** | 62 |
| 13 | मराठी ग्रामीण साहित्याचा मानदंड : डॉ. आनंद यादव **डॉ. अरुणा मोरे** | 66 |
| 14 | आत्मनिष्ठेच्या बळावर उभे राहिलेले आत्मचरित्र –'लांबा उगवे आगरी' **डॉ. भाऊसाहेब गमे** | 69 |
| 15 | जागतिकीकरण आणि सुनील अवचार यांची कविता **प्रा. सागर गवई** | 72 |
| 16 | तेलंगाणा राष्ट्र समिती **प्रा. माधव चोले** | 78 |
| 17 | भारतातील विरोधी पक्षाची भूमिका **प्रा. मनिष सोनवणे** | 84 |
| 18 | भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या समस्या, शासनाचे प्रयत्न व उपाय योजना **डॉ. सुरेश बन्सपाल** | 88 |
| 19 | तेलंगाणाची सांस्कृतिक- साहित्यिक परंपरा **डॉ. बी. व्ही. गमे** | 92 |
| 20 | तेदेपाची तेलंगाणा बाबत दुटप्पी भूमिका **प्रा. माधव चोले** | 96 |
| 21 | प्राण्यांविषयी पारंपरिक विचारसरणी : एक तात्त्विक विवेचन **डॉ. संजय ह. पाटील** | 101 |

Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Global Impact Factor – 0.565 (2014) & 0.676 (2015) Vol. 2 Issue. 4
ISSN :2348-7143 (Online)
Oct. - Dec.- 2015

# २०१४ महाराष्ट्र विधानसभा निवडणूक (जळगाव जिल्हा )

प्रा.डॉ.सौ.शुभदा ठाकरे
मार्गदर्शक
विद्यावर्धीनी महाविद्यालय, धुळे
जि.धुळे

प्रा. मनिष भालेराव सोनवणे
संशोधक विद्यार्थी
मसगा महाविद्यालय, मालेगांव
जि. नाशिक

ऑक्टोबर २०१४ मध्ये झालेल्या महाराष्ट्राच्या १६ व्या विधानसभेच्या निवडणूकीत भा.ज.पा. ने प्रथमच शिवसेनेशिवाय स्वबळावर निवडणूक लढत सत्तास्थानी पोहचण्यात यश मिळवले. अर्थात स्पष्ट बहुमत मिळालेले नसले तरी निवडणूकीतील यशाने निश्चीतच भाजपास महाराष्ट्रातील राजकारणात केंद्रस्थानी बनवले आहे. हे कुणासही नाकारता येणार नाही. १९९० च्या विधानसभा निवडणूकीत सर्वप्रथम भाजपा व सेना यांची युती अस्तित्वात आली. महाराष्ट्र हे कॉंग्रेस व्यवस्थेचे एक नमुनेदार राज्य असल्याने कॉंग्रेस व्यवस्थेला पर्याय देण्यासाठी अस्तित्वात आलेल्या युतीने १९९५ मध्ये सत्ता मिळवली. १९९९ ते २०१४ पर्यंत युती जरी सत्तेबाहेर असली तरी कॉंग्रेससमोर पर्याय म्हणून युतीने आपले राजकीय अस्तित्व कायम ठेवले. युतीच्या या चढत्या आलेखात उत्तर - महाराष्ट्रात मात्र कायमच भाजपा सातत्याने वरचढ ठरत होता. व त्यात ही भाजपाच्या यशात जळगाव जिल्ह्याची उत्तर महाराष्ट्राच्या संदर्भातून भूमिका महत्वाची राहिली आहे. २०१४ ची निवडणूक सेना - भाजपाने स्वबळावर लढवल्याने साहजीकच १९९५ पासून जळगाव जिल्ह्यातील राजकारणात प्रबळ बनलेल्या युती मधील सेना व भाजपा यांच्यातील कोणता राजकीय पक्ष वर्चस्व दाखवले हे उत्सुकतेचे होते मात्र भाजपाने ६ जागा जिंकून आपले प्रभुत्व सिद्ध केले. भाजपास आव्हान मिळाले ते सेनेकडून तर दुसरीकडे कॉंग्रेस राष्ट्रवादी यांची भूमिका मात्र या निवडणूकीपुरती तरी दुय्यम ठरली असेच म्हणावे लागेल.

**शोधनिंबधाचा हेतू -**

१) जळगाव जिल्ह्याच्या राजकारणाचे २०१४ मधील विधानसभा निवडणूक निकालाच्या आधारे विश्लेषण करणे.

२)जिल्ह्यातील कॉंग्रेस वर्चस्वाच्या ऱ्हासाची चर्चा करणे

३) जिल्ह्यातील भाजपा वर्चस्वाच्या राजकारणाची चर्चा करून भाजपाचे सामाजीक आधार रोखणे.

**गृहीतके -**

१) जिल्ह्यातील कॉंग्रेस वर्चस्वाचा लोप पावला आहे.

२) जिल्ह्यातील भाजपा चा जनाधार सातत्याने विस्तारत आहे.

**संदर्भ -**

निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ, वर्तमानपत्रातील विविध लेख, इत्यादी.

पूर्वीचा पूर्व खानदेश असलेल्या जळगाव जिल्ह्यात सध्या १५ तालुके असून विधानसभेचे ११ मतदारसंघ तर लोकसभेचे २ मतदारसंघ आहेत. जळगाव हे जिल्ह्याचे शहर असून भुसावळ, चाळीसगांव, अमळनेर ही लोकसंख्यात्मकदृष्ट्या नागरीकीकरण होत असलेली महत्वाची शहरे आहेत. जिल्ह्यात हिंदु धर्मीय बहुसंख्य असून मुस्लीम, ख्रिश्चन, शिख यांचेही वास्तव्य आहे. मराठा - कुणबी ज तीसमुहाचे लोकसंख्यात्मक दृष्ट्या प्राबल्य



Scanned with OKEN Scanner

(१९३१नुसार) आहे. याशिवाय लेवा पाटीदार, राजपूत, गुजर इत्यादी जातीकडे शेतजमीनीची मालकी असून जिल्ह्यातील शेती बागायती व नगदी पिकांची केली जाते. केळी व कापूस ही जिल्ह्यातील महत्वाची पिके असून राजकीयदृष्ट्याही संवेदनशिल आहेत.

**कॉंग्रेस वर्चस्वाचा कालखंड-**

फैजपूर येथे संपन्न झालेल्या कॉंग्रेसच्या पहिल्या ग्रामीण अधिवेशनानंतर जिल्ह्यातील बहुजन समाज कॉंग्रेसशी जोडला गेला. तसेच सहकार चळवळ व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामाध्यमातून कॉंग्रेसची संघटनात्मक व संस्थात्मक बांधणीमुळे कॉंग्रेसपक्षाचे जिल्ह्याच्या राजकारणात महत्वपूर्ण स्थान निर्माण झाले. १९७२ मधील विधानसभा निवडणूकीत पक्षात जिल्ह्यात तब्बल ७२ टक्के मते व ११ जागा मिळाल्या होत्या.

जिल्ह्यात कॉंग्रेसची पाळेमुळे एवढी घट्ट होती की, मराठी भाषीक महाराष्ट्राच्या मागणी आंदोलना दरम्यानच्या पार्श्वभुमीवर झालेल्या १९५० मधील मुंबई राज्याच्या विधीमंडळाच्या निवडणूकीत विदर्भ व मराठवाडा वगळता विशेषता पश्चिम महाराष्ट्रात कॉंग्रेसचे पाणीपत होत असतांना सुध्दा जिल्ह्यातील कॉंग्रेस वर्चस्व टिकून राहिले होते.

कॉंग्रेसच्या वर्चस्वामागील सामाजिक आधार देखील पाहणे महत्वाचे ठरले. महाराष्ट्रातील कॉंग्रेसच्या वर्चस्वाचा सर्वात मोठा सामाजिक आधार म्हणजे . मराठा - कुणबी जात समूहाचे समर्थन होय. त्यामुळे साहजिकच जिल्ह्यातील मराठा जातसमूह कॉंग्रेस सोबत राहिला त्याचप्रमाणे कॉंग्रेसच्या व्युरचनेनुसार स्थानिक जातींना सत्तेत समाविष्ट करून घेण्याच्या धोरणानुसार मधुकरराव चौधरी (१९५७ - ७२) व प्रतिभाताई पाटील (१९६२ - ७८) प्रदिर्घ काळ राज्याच्या राजकारणात यांनी विविध मंत्रीमंडळात राज्याचे प्रतिनिधीत्व केले. त्यामुळे मराठा राजपूत, लेवा पाटीदार या तिन्ही कृषीप्रधान जातीसमूह कॉंग्रेसचे नेतृत्व करीत असल्याने याशिवाय आदिवासी, दलीत मुस्लीम इत्यादीमुळे कॉंग्रेस भक्कमपणे जिल्ह्यात आपले वर्चस्व टिकवून ठेवण्या सातत्याने यशस्वी राहत असे.

१९५७ च्या निवडणूकीतील अल्प यशाव्यतीरिक्त कॉंग्रेसविरोधी पक्षांना कधीही जिल्ह्यांत कॉंग्रेससमोर आव्हान उभे करता आले नाही. समाजवादी, साम्यवादी पक्षांचा ठराविक मतदारसंघाव्यतीरिक्त प्रभाव नव्हता तर दुसरीकडे जनसंघास जिल्ह्याच्या राजकारणात फारसे बस्तान बसवता आले नव्हते. त्यामुळे कॉंग्रेस समोर निदान निवडणूकीच्या राजकारणात तरी आव्हान उभे करण्यात १९७८ पर्यंत इतर पक्षांना यश मिळत नव्हते.

**कॉंग्रेस वर्चस्वाच्या मर्यादा -**

पश्चिम महाराष्ट्रातील कॉंग्रेसी नेत्यांचे राजकारणासोबत सहकार चळवळीच्या माध्यमातून तेथील अर्थकारणावरही पकड होती. मात्र पूर्व खानदेशातील अर्थकारणावर पूर्वीपासून अमराठी जातींचे वर्चस्व राहीले. उदा. कांपूस उत्पादक जरी कृषीप्रधान जाती असल्या तरी कापड गिरण्या मात्र अमराठीकडे होत्या. त्यामुळे सहाजीकच पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने पूर्व खानदेशातील कॉंग्रेसची पकड काहिसी ढिली होती.

लेवा, मराठा, राजपूत या तिन्ही जातींना सोबत घेऊन सत्ता समतोल राखण्याचा प्रयत्न कॉंग्रेसकडून होत होता मात्र १९७८ च्या निवडणूकीत पहिल्यांदा या सामाजिक समीकरणास धक्का बसला. जनता पक्षाच्या माध्यमातून तसेच नंतरच्या काळातील कॉंग्रेसमधील फूटीमुळे वंजारी, धनगर, गुजर, तेली या सत्ता स्पर्धेच्या परीघावरील जातींनाही सत्तेत वाटा मिळाला.

शरद पवारांच्या समाजवादी कॉंग्रेसने जिल्ह्याच्या राजकारणात कॉंग्रेसविरोधी पक्षांना एकत्रीत घेऊन कॉंग्रेसला १९८० च्या दशकात चांगलेच जेरीस आणले होते. १९८५ विधानसभा निवडणूकीत समाजवादी कॉंग्रेस या जिल्ह्यात



Scanned with OKEN Scanner

पक्षांचे यावेळेस पहावयास मिळाले. कॉंग्रेसला एकही जागा मिळाली नाही. चौथ्या क्रमांकासाठी पक्षास मनसेसोबत तुल्यबळ संघर्ष करावा लागला. ही बाबच कॉंग्रेसचे जिल्ह्यातील राजकारणातील स्थान अधोरेखीत करते.

भाजपाच्या यशासंदर्भात चर्चा करीत असतांना त्यास अनेक पदर असल्याचे लक्षात येते. जिल्ह्याच्या राजकारणात भाजपाची भूमिका युतीच्या संदर्भात सेनेच्या तुलनेने नेहमीच महत्वाची ठरली होती. उदा. जि.प. अध्यक्षपद हे भाजपाकडे तर उपाध्यक्षपद सेनेकडे होते. लोकसभेच्या जिल्ह्यातील दोन्ही जागा नेहमीच भाजपाकडे राहिल्या. युतीच्या राजकारणाच्या अपरीहार्यतेतून सेनेस सातत्याने दुय्यम भूमिकेचा स्विकार करावा लागला तर दुसरीकडे भाजपास आपला पाया विस्तारण्यास संधी मिळत गेली कारण युतीविरोधी कॉंग्रेस व राष्ट्रवादी पुरेसे आव्हान (अपवाद २००९ विधानसभा निवडणूक) उभे करण्यात अपयशी ठरत होते.

देश व प्रदेश पातळीवरील बदलत्या राजकारणात भाजपाची भूमिका वर्तमान परिस्थितीत निर्णायक ठरत असल्याचा फायदा भाजपास मिळाला. १९९५ पासून सेनेकडे असलेलया मतदारसंघामध्ये भाजपा पक्षसंघटन कमकुवत होते त्या मतदारसंघामध्ये इतर पक्षाकडील उमेदवार आयात करण्याची खडसेंची खेळी यशस्वी ठरली.

भाजपाच्या जिल्ह्याच्या राजकारणातील वर्चस्वाच्या संदर्भातील सामाजिक आधाराचा लक्षात घेतल्यास खडसे सारख्या नेतृत्त्वामुळे जिल्ह्याच्या राजकारणातील महत्वाची समजला जाणारा जातसमूह भाजपाशी जोडला गेला. सोबत मराठा, कोळी, गुजर, माळी, वंजारी अशी मोट बांधण्यात भाजपा यशस्वी ठरले. सामाजिक अभियांत्रीकीचा कुश वापर करून गेल्या दशकभर युतीच्या माध्यमातून कॉंग्रेस प्रणीत मराठा - लेवा पाटीदार सत्तेच्या चौकटीस इतर मागासवर्गीय घटकांना सोबत घेवून सत्ता समतोल राखत भाजपाने आपले वर्चस्व ग्रस्थापीत केलेले दिसून येते.

**अनुमान -**

१) जळगाव जिल्ह्यातील राजकारणातील कॉंग्रेस वर्चस्वाची चौकटीची जागा भाजपा वर्चस्वाने घेतली आहे.

२) इतर मागासवर्गीय जातींच्या राजकीय उदयामुळे प्रस्थापीत राजकीय सामाजिक समिकरणांची फ़ेरमांडणी झाली आहे.

३) भाजपाविरोधी राजकीय अवकाश आगामी काळात कोणता राजकीयपक्ष व किती प्रमाणात व्यापेल हे आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकामधून ठरेल.

४) कॉंग्रेस व राष्ट्रवादीस जिल्ह्यातील पक्षाच्या संघटनात्मक बांधणी सोबतच आपल्या सामाजिक आधारांची फेरजुळवणी करणे गरजेचे आहे.

**Ref-**

१) Maharashtra Assembly Election , Suhas Palshikar epw १८ oct २०१४, २०१-४९ २००४

२) सत्तासंघर्ष - महा सत्तासंघर्ष

३) Newspaper लोकसत्ता, लोकमत, सकाळ, इत्यादी

४) Election Commission Website

५) परीवर्तनाचा वाटसरू मासिक - (१ ते १५ डिसेंबर २०१४)



Scanned with OKEN Scanner

ISSN :2348-7143 (Online)
Oct. - Dec.- 2015

मित्रपक्षांसह ८ जागा जिंकता आल्या होत्या. मराठा व अमराठी नेत्यांची मोट बांधण्यात त्यावेळेस पवार यशस्वी झालेले होते.

१९९० काळात सेना - भाजपा युतीने जिल्ह्यात खऱ्या अर्थाने आपला प्रभाव निर्माण करण्यास सुरूवात झाली. पवारांचा काँग्रेस प्रवेश तसेच जनता दलाचा ओसरता प्रभाव या दोन्ही बाबी युतीस काँग्रेस विरोधी अवकाश प्राप्त करण्याकरीता फलदायी ठरल्या.

**युतीचा यशस्वी प्रवास -**

१९९० ते २०१४ या कालखंडातील महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीतील युतीचा आलेख हा सातत्याने जळगाव जिल्ह्यात चढता राहिला आहे. १९९९ व २००४ या दोन्ही निवडणूकीत भाजपास मिळालेल्या ५ जागा या राज्यातील कोणत्याही जिल्ह्यापेक्षा त्यावेळेस जास्त होत्या. तर दुसरीकडे सेनेलाही मिळालेल्या (१९९९) ५ जागा या त्यावेळेस राज्यात ठाणेनंतर दुसऱ्या क्रमांकाच्या होत्या.

स्त्रोत - निवडणुक आयोग संकेतस्थळ www.eci.nic

१९९० पासून काँग्रेसला युतीने धक्के देत आपला जनाधार व्यापक करीत असतांनाच १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेमुळे काँग्रेसचा जनाधार अधिक संकुचित झाला. स्थानिक स्वराज्य संस्थापासून ते लोकसभेच्या निवडणूकीपर्यंतच्या सर्वच निवडणूकीत युतीचा वरचष्मा जिल्ह्याच्या राजकारणात सातत्याने राहीला त्यास जिल्ह्याच्या सहकारी संस्थाच्या आर्थिक नाड्या ताब्यात असलेली जिल्हा मध्यवर्ती बँक ही अपवाद राहिली नाही.

१९९७ पासून आजपावेतो जळगाव जिल्हा परिषद सातत्याने युतीच्या ताब्यात असल्याने युतीच्या ताब्यात असल्याने युतीच्या वर्चस्वास संस्थात्मक आधारही स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून प्राप्त झाला त्यामुळे काँग्रेस वर्चस्वाची जागा सेना - भाजपा युती ने घेतली. पुलोंद प्रयागानंतरच्या समाजवादी काँग्रेसच्या शरद पवारांच्या १९८० च्या दशकात चांगलेच यश मिळाले होते. साहजीकच राष्ट्रवादीच्या स्थापनेमुळे काँग्रेसची भूमिका काँग्रेस आघाडीतही दुय्यम ठरली. १९९९ च्या निवडणूकीत युतीस मोठे जोरदार आव्हान उभे केले व १९९५ नंतर पहिल्यादा निवडणूकीच्या राजकारणात युतीस पराभव सहन करावा लागला. राष्ट्रवादीस ५ तर युतीस अवघ्या ४ जागा मिळाल्या होत्या तर अपक्ष २ जागी विजयी झाले होते.

**२०१४ ची विधानसभा निवडणूक -**

२०१४ मधील विधानसभा निवडणूक ही राज्यातील चारही पक्षांनी स्वबळावर लढल्यामुळे जिल्ह्याच्या राजकारणात आमुलाग्र बदल झाले. १९९० पासून यशस्वी वाटचाल करीत असलेल्या युतीमधील मित्रपक्ष्ज भाजपा व सेना हे प्रथमच समोरासमोर लढले त्यामानाने आघाडीत काँग्रेसची अवस्था नाजूक झाल्याने मुख्य निवडणूक ही भाजपा, सेना, राष्ट्रवादी अशी तिरंगी झाली.

वास्तवीक युतीतील फुटीचा व काँग्रेसच्या गैरहजेरीचा फायदा राष्ट्रवादीस घेता आला नाही. त्यामागील कारणे सत्ताधाराबाबत जनतेतील रोष, राष्ट्रवादीवर होणारे भ्रष्टाचाराचे आरोप तसेच मराठा केंद्रीत राजकारण उदा. जिल्ह्यातील ९ खुल्या मतदारसंघात राष्ट्रवादीचे ७ उमेदवार मराठा होते. या सर्व बाबीमुळें जिल्ह्याच्या सर्वच मतदारसंघात भा.ज.पा. केंद्रस्थानी राहिला व ज्या ठिकाणी भा.ज.पा. उमेदवार कमकुवत ठरले तेथे त्याचा फायदा सेनेस काही प्रमाणात मिळाला. ११ जागापैकी भाजपा - ६, सेना - ०३ राष्ट्रवादी - १, अपक्ष -१ असे बलाबल विविध राजकीय


Scanned with OKEN Scanner